## प्रकरण २ - उपनिषत्कालीन शिक्षण

वैदिक वाङ्मयात कालक्रमानुसार उपनिषदांचे स्थान जरी शेवटी असले तरी भारतीय तत्वज्ञानाच्या दृष्टीने त्यांचे स्थान पहिले आहे. प्रस्थानत्रयीत ही त्यांना प्राधान्य आहे.

उपनिषद् हा शब्द पुढील प्रमाणे तयार झाला आहे.
[उप + नि + सद्] म्हणून उपनिषद शब्दाचा अर्थ -
शिष्याने गुरुच्या अगदी जवळ [उप] खाली [नि] बसणे [सद्]
सद् = एकान्त बैठक किंवा गुप्त बैठक.

शंकराचार्यांच्या मते "संसाराचे मूळ कारण असलेल्या अविद्येचा नाशकरुन ब्रह्मप्राप्ती करुन देणारी विद्या अथवा ज्ञान म्हणजे उपनिषद होय". ही विद्या ज्यात सांगितली आहे तो ग्रंथ म्हणजे 'उपनिषद' होय.

वैदिक परंपरे प्रमाणे उपनिषद् शब्दाचा अर्थ "रहस्य" किंवा "गुप्त गोष्ट" असा आहे.

वरील कोणताही अर्थ घेतला तरी तो गुरुशिष्यांच्या संदर्भात घ्यावा लागतो. वैदिक परंपरेनुसार गूढ किंवा रहस्य एकांतात गुरुने शिष्याला सांगायचे आहे. ते गूढ ज्ञान गुरुकडून शिष्यापर्यंत उतरत असताना ज्या प्रक्रिया घडत त्या म्हणजे गुरुशिष्यसंबंध होय. गुरुशिष्यांचे हे संबंध अत्यंत जिव्हाळ्याचे असत. हृदयाचा हृदयाशी संवाद घडत असे "ये हृदयींचे ते हृदयी घातले"-ज्ञानेश्वरी. गुरुवर शिष्याची गाढ श्रद्धा असे.

शिष्याबद्दल गुरुनाही कळकळीची भावना असे. आपल्याजवळचे ज्ञान योग्य शिष्याला देण्यास गुरु उत्सुक असत. अशा त-हेने ज्ञान देण्याची उत्कट इच्छा असणारे गुरु व ज्ञान मिळविण्याची आंतरिक तळमळ, जिज्ञासा असणारा शिष्य एकत्र आले की, त्याठिकाणी ज्ञानसंक्रमण घडत असे. जेथे तर्क, वितर्क लढविले जात नाहीत, ज्ञानाबद्दल व गुरुबद्दल संशयाची भावना नाही तेथेच ही ज्ञानप्रक्रिया घडते. अशा त-हेने पूर्वी शिक्षणपध्दती होती. या पध्दतीत शिष्यावर अनेक बंधने असत. गुरुनाही विशिष्ट पात्रता असल्याशिवाय ज्ञानदान करता येत नसे. सत्पात्र गुरु व सत्पात्र शिष्य असेल तरच हे ज्ञानदान घडत असे.

"ज्ञानदान" हे एक अत्यंत पवित्र कार्य असल्याने त्याबाबतीत अनेक बंधने शिष्यावर लादली जातात. विद्याग्रहण निसर्गाच्या सानिध्यात, एकांतात केल्यास त्याचा परिणाम चांगला होत असे. चित्त एकाग्र होण्यासाठी वरील बंधने विद्यार्थ्यांवर आवश्यकच आहेत. त्याशिवाय ज्ञानग्रहणाचे कठीण कार्य - विद्या संपादन करणे, हे शक्य होणार नाही.

समाजापासून दूर गुरुंच्या आश्रमात ज्ञानदान चालत असे. त्यासाठी विद्यार्थ्याला आपले सर्वपाश सोडून १२ वर्षे गुरुगृही रहावे लागत असे. साहजिकच गुरुंच्या आश्रमात गुरुंच्या आज्ञेनुसार सर्व कार्ये करावी लागत. शिष्याला वळण लावणे, त्याच्या प्रत्येक हालचालीवर लक्ष ठेवणे, चुकेल तेथे योग्य ती शिक्षा करणे ही कार्ये गुरुना करावी लागत. योग्य शिष्य तयार करणे हे गुरुंचे काम. त्यासाठी गुरुना सर्व अधिकार असत. पालक कधी तक्रार करत नसत. कारण गुरु हेच शिष्याचे पालक ही असत. अशा वातावरणातून उद्याचा नागरिक जो बनत असे तो सुसंस्कारित, सुविद्य असाच आदर्श नागरिक तयार होत असे. आज जे शिक्षणाचे महत्वाचे उद्दिष्ट आपण मानतो ते पूर्वी अवश्य साध्य होत असे.

गुरुंच्या आश्रमात गेल्यानंतर दैनंदिन कामकाज शिष्याला करावे लागे. गुरुंच्या पूजेची सामग्री, दूर्वा-समिधा इ. गोळा करणे, त्याचबरोबर दैनंदिन गरजा म्हणून लाकूडफाटा गोळा करणे, गुरे राखणे, शेतीकडे लक्ष देणे इ. कामे देखील विद्यार्थ्यांना करावी लागत असत. म्हणजेच ज्ञानदाना बरोबरच व्यावहारिक ज्ञानाचे धडे शिष्यांना आपोआपच मिळत असत. या सर्वांतून त्यांचा शारीरिक-बौध्दिक-मानसिक विकास साधत असे.

गुरुंकडून ज्ञानदानाची प्रक्रिया विद्यार्थ्यांचे उपनयन झाल्यानंतरच सुरु होई. मौंजीबंधन संस्कारानंतर शिष्य हातात समिधा घेऊन नम्रपणाने गुरुंकडे येत व आपली जिज्ञासा गुरुंजवळ प्रकट करीत. चाणाक्ष गुरु शिष्याची विविध त-हेने पारख करुन मगच ज्ञानदानाचे पवित्र कार्य हाती घेत असत.

## प्रकरण २ - अ - शिष्य परीक्षा

पूर्वीच्या काळी आजच्या सारख्या लेखी किंवा तोंडी परीक्षा नसत. किंबहुना आपली परीक्षा आज होणार आहे याची शिष्याला कल्पनाही नसे. विविध प्रसंगातूनच, वेगवेगळ्या पध्दतीने या परीक्षा होत. यात विद्यार्थ्याची खरी कसोटी लागे. परीक्षा घेणाऱ्या गुरुंची अचाट बुध्दिमत्ता देखील प्रकट होई. गुरुशिष्यांच्या संवादातून शिष्याचे वर्तन, स्वभाव, इंद्रिय निग्रह, जिज्ञासा, नि:स्वार्थीवृत्ती, नम्रता यांचे दर्शन होई. त्यावरुन त्याला ज्ञान द्यायचे की नाही ते गुरु ठरवीत असत.

"जाबाला" नामक शूद्र स्त्रीचा एक पुत्र ज्ञानलालसेने हारिद्रुमत गौतम मुनींकडे गेला, म्हणाला - "मला शिकवा, माझे उपनयन करा".

गुरुने त्याला विचारले,- "तुझे गोत्र कोणते"? त्याचे उत्तर त्याला ठाऊक नव्हते. त्याने आईला विचारुन जसेच्या तसे उत्तर सांगितले. त्याबद्दल त्याला कमीपणा वाटला नाही. या त्याच्या सत्यपणावरुन गुरुनी त्याचे नाव 'सत्यकाम जाबाल' असे ठेवले.

शिष्याच्या प्रामाणिकपणाची ही परीक्षा. आणि तो खरे बोलला म्हणून खूष होऊन त्याचे शिष्यत्व मान्य केले. त्याला ब्राह्मण्य ही बहाल केले. केवढी ही गुरुंची उदारवृत्ती ! उच्च नीच हा भेद भाव जन्माने ठरत नसून कर्माने व गुणाने ठरतो. हीन कुळातील जाबाल सत्यवचनी वृत्तीने, ब्राह्मण्य प्राप्त करता झाला.[१]

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

यावरुन त्या काळी समाजव्यवस्था निकोप होती. जाती जन्माने न ठरता कर्माने ठरत. प्रत्येकाला आपली प्रगती करुन घेण्याची संधी उपलब्ध असे. हीन कुळात जरी जन्म झाला तरी स्वतःच्या कर्तृत्वाने तो श्रेष्ठ ठरत असे. कर्तव्यकर्म जीवनात श्रेष्ठ होय. भोगापेक्षा त्यागाकडे लोकांचे मन आकर्षिले जाई. कर्तव्यकर्म यथायोग्य पार पाडून समाधान मिळविणे, दुस-याना संतोष देणे ही प्रत्येकाची भूमिका, समाजाची मनोधारणा विद्यार्थीदशेतच तयार होत असे.

पूर्वीच्या काळी विद्याध्ययन हे गुरुगृही जाऊनच करावे लागे. १२ वर्षे गुरुंच्या आश्रमात विद्यार्थ्यांना रहावे लागे. गुरुंच्या घरची कामे करुन, मोजकी विश्रांती व नियंत्रित आहार घेऊन विद्याध्ययन करावे लागे. विद्यार्थी म्हटला की त्याने आळस, प्रथम सोडला पाहिजे. चैन, आराम ह्या गोष्टी विद्यार्थ्याला वर्ज्य. गुरुंच्या आज्ञेनुसार सर्वकर्मे करुन विद्यार्जनातही गोडी दाखविली तरच विद्यार्जन शक्य असे. पहाटे उठून स्नान-संध्या, गुरुसेवा इ. करुन नियमितपणे व नम्रपणे विद्याग्रहण करावी लागे. अभ्यासात एकाग्र चित्त होण्यासाठी सुखासीनता सोडली पाहिजे. 'उपकोसल' च्या उदाहरणावरुन हे कळून येते.[२]

कमलचा मुलगा उपकोसल सत्यकाम जाबालांच्या आश्रमात १२ वर्षे राहिला. पण त्याचा कल सुखासीनतेकडे असल्याने तो दररोज भरपूर कामे करुन भरपूर खायचा-प्यायचा आणि भरपूर झोपायचा. त्यामुळे त्याच्याकडून ज्ञानार्जन घडले नाही. मग जेव्हा त्याने उपोषण [अनशन] चालू केले, तेव्हा त्याच्यात बदल होऊ लागला. त्याचा मेद कमी होऊन आत्मशुध्दी होऊ लागली. अनशनाने कामनांचा [इच्छांचा] नाश होऊन आत्मबळ वाढू लागले. ज्ञानप्राप्तीसाठी चित्त एकाग्र होऊ लागले. स्मृती तल्लख बनली,

गुरुंची व्याख्याने आठवू लागली, मग गुरुही त्याला आपणहून ज्ञानदान करु लागले. अशा त-हेने तो विद्वान बनला.

शिष्याने स्वत:तील दोष आत्मपरीक्षणाने शोधून काढले पाहिजेत. ते दोष नाहीसे करण्याचा प्रयत्न केल्यावर गुरुंना ही आनंदच होतो. शिष्याच्या सद्गुणावर नेहमी गुरु खुष होतात. शिष्यातील तर दुर्गुणावर ते नाराज असतात. गुरुंचा हा गुण शिष्यानी ओळखून गुरुंच्यावर प्रभाव पाडण्यासाठी चांगले वागणे, चांगल्या वृत्ती प्रयत्नपूर्वक अंगी बाणवणे आवश्यक ठरते.

ज्ञानदानाचे पवित्र कार्य गुरुनी हाती घेतल्यावर योग्य शिष्य परीक्षा करणे, गुरुचे कर्तव्य ठरते. गुरु जसे ज्ञानी, असणे आवश्यक तसा शिष्य देखील ज्ञानार्जनास लायक हवा. उध्दट, अहंमन्य, शिष्याला विद्या-दान केले जात नसे. नम्रता व सेवाधर्म हे दोन अत्यंत आवश्यक असे शिष्याचे गुण शिरोव्रत, ज्यानी यथाविधि आचरिले आहे, त्यानाच ही ब्रह्मविद्या सांगावी, असे मुंडक, सांगते.– कर्तव्यात तत्पर, विव्दान, ब्रह्मनिष्ठ, श्रध्दावान पुरुष, श्रेष्ठ असे शिरोव्रत धारण करत नसतील; तर त्याना अध्ययन करता येणार नाही.

क्रियावन्त: श्रोत्रिया ब्रम्हनिष्ठा:
स्वयं जुह्वत एकर्षिं श्रध्दयन्त:।
तेषामेवैतां ब्रह्मविद्यां वदेत
शिरोव्रतं विधिवद्यैस्तु चीर्णम्।।

तदेतत् सत्यमृषिरङ्गिरा: पुरोवाच नैतदचीर्णव्रतो अधीते।

उध्दट, अहंमन्य श्वेतकेतु १२ वर्षे गुरुकडे जाऊन, तसाच परतला तेव्हा त्याच्या पित्याने त्याची कानउघाडणी केली. गुरुनिंदा केल्याबद्दल त्याचा पिता 'आरुणि' यानी त्याला शिक्षा केली. त्याला आपल्या गैर वर्तनाबद्दल जेव्हा पश्चाताप झाला, तेव्हाच त्याला आत्मज्ञानाची शिकवण दिली. आरुणि हा जन्मदाता पिता पण श्वेतकेतुचा तो अध्यात्मपिताही बनला. [३]

माता-पिता हे देखील पुत्राचे आध्यात्मिक गुरु असु शकतात. श्वेतकेतुस-"आरुणि" या पित्याने ज्ञानदान केले तसे

"इतरा" नामक मातेने आपल्या पुत्राला - महिदासाला विद्वान केले. [४]

शूद्र जातीचा महिदासपण आईच्या प्रेरणेने ज्ञानोपासक बनला. त्याच्यावर त्या मातेने चांगले संस्कार घडविले, त्यामुळे ज्ञानाचे प्रचंड भांडार-वेद, ब्राह्मण ग्रंथ इ. ची त्याने निर्मिती केली. ब्रह्मतत्व, आत्मविद्या जाणली आणि ब्रह्मज्ञ झाला. त्याच्या मातेच्या नावावरुनच त्याच्या ग्रंथाला "ऐतरेय उपनिषाद्" हे नाव मिळाले.

[इतराया: अपत्यं पुमान् ऐतरेय: । तस्य उपनिषाद् । ]

अशा त-हेने एखादी व्यक्ती जन्माने, कुलाने कोणही असो, ज्ञानसाधना करुन तिला "ऋषी" हे श्रेष्ठ पद मिळविता येत असे. त्या काळात ज्ञानाची कवाडे सर्वांना खुली होती. ज्ञानसंपदा ही फक्त ब्राह्मण वर्गाची मक्तेदारी नव्हती.

तसेच ज्ञानसाधना फक्त पुरुषांसाठीच नसे. तर जिज्ञासू स्त्री देखील ज्ञानाची अधिकारी होऊ शके. पती हेच बहुधा पत्नीचे गुरु असत.

उदा. याज्ञवल्क्य आणि मैत्रेयी संन्यास घेऊ इच्छिणारा याज्ञवल्क्य, संपत्तीची वाटणी आपल्या दोन्ही बायकांत करून देत असता, मैत्रेयी नावाची त्याची पत्नी त्याला म्हणते की, "ही नश्वर संपत्ती मला नको. शाश्वत आनंद देणारे जे ज्ञान तुमच्याकडे आहे, ते मला तुम्ही द्या, ". तेव्हा पतीने ते कबूल केले आणि "आत्मा वाऽ रे द्रष्टव्य: श्रोतव्य: मन्तव्य: निदिध्यासितव्य: I " असे ज्ञान द्यायला सुरुवात केली.[५] पत्नीची जिज्ञासूवृत्ती पारखूनच तिला ज्ञान देण्यात आले.

सर्वच स्त्रिया केवळ संसारात रमतात असे नाही. 'कात्यायनी' ही संसारी स्त्री होती तर 'मैत्रेयीला' परमात्म्याची ओढ होती. म्हणूनच ज्ञानप्राप्तीत आनंद मानणारी होती. पण अशा स्त्रीयाना देखील शिक्षणाची संधी उपलब्ध होती असे दिसून येते.

कालांतराने स्त्रियाना स्वातंत्र्य, शिक्षण इ. गोष्टींची संधी नाकारली गेली. काळाच्या ओघात शिक्षणावर ही परिणाम झाला. शिक्षण हे पुरुषांची मक्तेदारी बनले. त्यानंतर काही काल गेला आणि पुन्हा नव्याने स्त्रीशिक्षणाची चळवळ चालू झाली. हिंदूस्थानात शिक्षणक्षेत्रात काही समाजसुधारक पुढे आले. महर्षी धोंडो केशव कर्वे, महात्मा फुले या सारख्या समाज धुरंधरानी स्त्री शिक्षणाचे कार्य हाती घेतले. आज तर मुलांच्या बरोबरीने मुलीही सर्व क्षेत्रात शिक्षण घेताना दिसून येतात.

उपनिषदाच्या काळात मैत्रेयी व गार्गी या दोन प्रसिध्द विदुषी होत्या. विद्वानांच्या सभेत वादविवादात भाग घेऊन गार्गीने याज्ञवल्क्याना दोन प्रश्न विचारले. त्या प्रश्नांची यथायोग्य उत्तरे

मिळाल्यावर याज्ञवल्क्याचे ज्ञानश्रेष्ठत्व कबूल करुन ती वादविवादातून निवृत्त होते.[६]

येथे वादविवाद धैर्याने भाग घेणारी, ब्रह्मवर्चस्विणी व सरळ, उदार स्वभावाची स्त्री दिसून येते.

ज्ञानी मनुष्य ज्ञानाच्या योगे अहंमन्य न होता, नम्र होतो असे दिसून येते. तसेच इतर विद्वानांचा द्वेष न करता आपल्यापेक्षा जास्त ज्ञान असणा-यांचे श्रेष्ठत्व प्रांजळपणे कबूल करण्याची वृत्ती प्रकट होते.

ज्ञानाच्या क्षेत्रात नि:पक्षपाती स्पर्धा असावी. त्यात मत्सर, व्देष नसावा. खा-या ज्ञानी माणसाबद्दल सर्वांनी आदर राखावा, ज्ञानाची कुचेष्टा होऊ नये.

पूर्वीच्या काळी वादविवादासाठी विद्वानांच्या सभा आयोजित केल्या जात. वादात टिकून राहणारे ज्ञानात श्रेष्ठ ठरत. वादात जिंकणारे व वादात हरणारे यांच्यात पुन्हा गुरुशिष्य असे नाते निर्माण होई.

वादात ऋषी - मुनींच्या बरोबर क्षत्रिय राजे देखील सहभागी होत असत. असे हे ज्ञानी राजे आपले राजकार्य अधिक दक्षतेने पार पाडीत असत. उदा. जनक राजा[७].

याज्ञवल्क्य मुनींनी ज्ञान व विज्ञान यांचा मेळ घालणारे आत्मस्वरुपाचे ज्ञान जनकराजाला देऊन त्याचे ज्ञान परिपूर्ण केले. त्याच्या मोबदल्यात जनक राजाने धन, धान्यवाद आणि खुशीने राज्यही बहाल केले आहे.

काशीचा प्रसिध्द राजा अजातशत्रू होय. त्याच्याकडे वेदवेत्ता म्हणून प्रसिध्दी मिळविलेला गार्ग्य कुळातील "बालाकि" येतो. त्या दोघात ब्रह्मज्ञानासंबंधी चर्चा होते. वाद-विवाद होतो. त्यातून "बालाकि" ला आपले ज्ञान अपुरे असल्याचे कळून येते. या ठिकाणी ज्ञानाच्या बाबतीत "अहंभाव" असणारा "बालाकि" सारखा शिष्य नम्र बनून अजातशत्रू ह्या गुरूकडून ज्ञानप्राप्ती करून घेतो.

अशा त-हेने विद्वानांच्यामध्ये आपापसात मोकळेपणाचे, आदराचे असे संबंध पूर्वी होते. समाजामध्ये वातावरण खेळीमेळीचे होते. एकमेकाना दोष देणे, मत्सर करणे इ. दूषित भावना त्यांच्यात नव्हती.

ज्ञानाचे क्षेत्र हे फक्त वयाने प्रौढ असणाऱ्यांपुरते नव्हते तर त्यात वयाने लहान पण बुध्दीने महान अशांचा देखील समावेश होत असे.

लहान वयात ज्ञानाची तळमळ असणारा नचिकेता स्वत: यमधर्माकडे जातो. [वडलांच्या शब्दानुसार] त्यानी दिलेल्या तीन वरांपैकी एका वराने मृत्यूचे स्वरूप जाणून घेण्याची इच्छा प्रकट करतो. ज्ञानप्राप्तीच्या मोबदल्यात धन, धान्य, हत्ती- घोडे, राज्य, सुंदर युवती इ. कशाचेहीदान नाकारतो. सर्व भौतिक सुखांचा त्याग करायला लहान वयात तयार होतो. ध्येयवेडा नचिकेता [१] आत्मज्ञान प्राप्तीने ध्येय प्राप्त करून घेतल्याशिवाय रहात नाही.

ही ज्ञानी माणसे तेजस्वी स्वभावाची व स्वाभिमानी वृत्तीची असतात. कोणत्याही मायापाशात गुरफटतनाहीत "ज्ञान" सर्वश्रेष्ठ आहे, हे त्यानाच जाणता येते. म्हणून ज्ञानी माणसे निर्भयपणे जगात वावरत असतात. ज्ञानकण वेचत आपले आयुष्य व्यतीत करतात.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

शिक्षणाचे हे क्षेत्र अतिशय महत्वाचे, पवित्र अनन्यसाधारण आहे. त्याठिकाणी गुरूकडून ज्ञानप्राप्ती करून घेताना, गुरूसेवेचे अखंड व्रत धारण करावे लागते. गुरूची आज्ञा सदैव पालन करीत, गुरूसाठी जीव ओवाळून टाकण्याची वेळ आली तरी त्याची तयारी हवी.

धौम्यऋषींचा शिष्य 'आरुणि'[१०] याच्या उदाहरणावरून हे दिसून येते.

गुरूंच्या शेताचा बांध फुटला असता आरुणीने स्वत: आडवे पडून बांध अडवला. रात्रभर शरीर गारठले तरी तो तेथेच पडून होता. गुरूंची कामगिरी पार पाडत असता थंडीची, जीवाची पर्वा केली नाही. शेवटी शिष्याचा शोध घेत स्वत: गुरू तेथे आले, शिष्याची गाढ भक्तीपाहून संतुष्ट झाले. त्याला आशीर्वाद देऊन त्या दिवसापासून त्याचे नाव 'उद्दालक' असे ठेवले.

याच धौम्यऋषींचा आणखी एक शिष्य 'उपमन्यू'[११] नावाचा होता. एकदा गुरूनी त्याचे खाणेपिणे बंद केले. त्याची भिक्षा काढून घेऊ लागले. गायीचे दूध पिण्यास किंवा दुधाचा जमिनीवर पडलेला फेस चाटण्यास देखील मनाई करण्यात आली. साहजिकच भुकेने व्याकूळ होऊन त्याने एका झाडाची पाने खाल्ली. त्याचा परिणाम असा झाला की, तो अंध होऊन एका पाणी नसलेल्या विहिरीत पडला. तरीपण त्याने गुरूना दोष दिला नाही. गुरूनिंदा देखील केली नाही. गुरूंच्यावर गाढ श्रध्दा असल्याने गुरु त्याला शोधात आले. त्यांच्याकृपेने त्याचे अंधत्व तर गेलेच. शिवाय सर्वविद्या तत्काळ प्राप्त झाल्या.

अशा त-हेने शिष्याची परीक्षा विविध पध्दतीने घेतल्याची उदाहरणे उपनिषदात आढळतात. ही परीक्षा कधीगुरुशिष्यांच्या संवादातून तर कधी प्रासंगिक विविध संकटांची निर्मिती करुन विद्यार्थी त्यातून माघार घेतो का हे पाहिले जाई. विद्यार्थ्याची ज्ञानाबद्दल जिज्ञासा, कळकळ किती आहे, कष्ट करण्याची, त्याग करण्याची कितपत तयारी आहे ? गुरुबद्दलची निष्ठा - भक्ती किती आहे, या सर्वांची परीक्षा होत असे. जणू ही शिष्याची प्रवेश परीक्षाच होय. ज्ञान देण्यास शिष्य लायक आहे का ? याची पारख करुन नम्र विद्यार्थ्यालाच ज्ञानदान ते करीत असत.

ज्ञान हे अत्यंत तेजस्वी, बहुमोल असल्याने ते कोणाही सोम्या-गोम्याच्या हाती पडणे योग्य नाही. त्याचा अधिकारी - योग्य पुरुष-व्यक्ती असणे आवश्यक आहे. ज्ञान एक शक्ती, श्रेष्ठ विद्या, अमूल्य असे धन, अविनाशी ठेवा असल्याने जगात सर्वात महत्वाचे असे आहे. तो मिळविणारा "सत्पात्र आहे का?" हे पाहूनच त्याच्याकडे ते सुपूर्द केले जाई.

--- x ---